# कालिदास, भारवि, भवभूति, राजशेखर आणि विदर्भ



**'कालिदासाने विदर्भाविषयी रघुवंशात एक गौरवपूर्ण विधान केले आहे. विदर्भ देश हा सौराज्यरम्य म्हणजे सुराज्याने रम्य झालेला आहे असे तो म्हणतो. विदर्भाचे असे वर्णन कालिदासाशिवाय आणखी कोणी केलेले नाही. कालिदासाच्या काळी विदर्भाचे राजकीय दृष्ट्या दोन तुकडे झालेले होते व तेथे सुराज्य नांदत असले तरी ते भारतात विदर्भापासून दूर राहत असलेल्या कवींना कळण्याइतकी विदर्भाची प्रसिध्दि नव्हती. सौराज्यरम्य हे विदर्भाचे वर्णन विदर्भराजाची स्तुती करण्याच्या संदर्भात आलेले नाही. तेव्हा कालिदासाच्या मते विदर्भात खरोखरच सुराज्य नांदत होते असे मानावे लागते व तसे मानल्यास त्याचा विदर्भाशी घनिष्ट संबंध सूचित होतो.**

**डॉ. नी. र. व्‍हाडपांडे**

**भा**रताचे महान नाटककार व कवी कालिदास भारवि, भवभूति आणि राजशेखर यांचा विदर्भाशी काय सम्बन्ध होता याबद्दल कुतूहल असणे स्वाभाविक आहे. कालिदासाचा विदर्भाशी सम्बन्ध त्याच्या वैदर्भी शैलीवरून स्थापित होतो. काव्यादर्शकावर दण्डी याने वैदर्भी शैलीचे वर्णन ''प्रतीतिसुभगं वचः'' असे केले आहे. प्रतीतिसुभग म्हणजे समजण्यास सोपे. पण एवढ्या एकाच गुणामुळे वैदर्भी शैली सिध्द होत नाही. रामायण आणि महाभारताची शैली देखील समजण्यास अत्यन्त सुलभ आहे. पण तिला वैदर्भी शैली म्हणत नाहीत. रामायण/महाभारताचा वाचकावर जो प्रभाव पडतो तो भाषाशैलीमुळे पडत नसून त्यातील कथा अत्यन्त प्रभावी आहे म्हणून पडतो. त्यामुळे रामायण/ महाभारताचे सामर्थ्य भाषान्तरात देखील कायम राहते. पण वैदर्भी शैली ही शैली म्हणूनच प्रभावी आहे. भाषान्तरात तिचा प्रभाव कायम राहत नाही. कालिदासाच्या कोणत्याच भाषान्तरात त्याच्या काव्याचे सामर्थ्य शतांशही उतरले नाही.

वैदर्भी शैलीबद्दल बिल्हण म्हणतो:-

अनभ्रवृष्टिः श्रवणामृतस्य, सरस्वतीविभ्रमजन्मभूमिः।
वैदर्भरीतिः कृतिनामुदेति सौभाग्यलाभप्रतिभूः पदानाम्॥

ढगाशिवायच श्रवणामृताचा वर्षाव करणारे, पदांना सौभाग्य प्राप्त करून देणारे असे सरस्वतीच्या विलासाचे निधान म्हणजे वैदर्भी रीती.

या रीतीला वैदर्भी कां म्हणतात?

कालिदास ख्रि.पू. दुसऱ्या शतकात झाला हे त्याने मालविकाग्निमित्राच्या भरतवाक्यात अग्निमित्र शुगाचा वर्तमान राजा म्हणून उल्लेख केला यावरून स्पष्ट आहे. भासाची नाटके कालिदासाच्या पूर्वीची आहेत. त्यातील तुरळक श्लोकांची रीती वैदर्भी आहे असे म्हणता आले तरी तेवढ्यावरून या रीतीला वैदर्भी म्हटले असेल असे वाटत नाही. भासाची नाटके अभिनयप्रधान आहेत. त्यातील श्लोकांची शैली हा त्या नाटकांचा फारच गौण भाग

आहे. शिवाय भासाचा विदर्भाशी काही सम्बन्ध होता असे म्हणायला काहीच आधार नाही. सहाव्या शतकातील भारवि हा विदर्भातील अचलपुर म्हणजे एलिचपुर येथे राहत होता पण त्याने आपले ''किरातार्जुनीय'' हे एकमात्र उपलब्ध महाकाव्य वैदर्भी रीतीत लिहिले नाही. उलट वैदर्भीपेक्षा वेगळ्या पण्डिती गुणांनी युक्त अशा शैलीचा तो प्रणेता समजला जातो. सातव्या शतकातील भवभूति ''मी विदर्भातील पद्मपुर या गावी राहतो'' असे स्पष्टच म्हणतो. पण त्याची शैली वैदर्भी नाही. दहाव्या शतकातील राजशेखर कवीने ''विदर्भविषय: सारस्वतीजनमभू:'' विदर्भ हे विद्वानांचे माहेरघर आहे असे उद्गार काढले आहेत पण त्याचे कुलनाम यायावर होते व तो कान्यकुब्ज नरेशांचा राजगुरू होता. तेव्हा तो स्वत: विदर्भी होता असे मानायला दुसरे प्रमाण पाहिजे. मिराशि त्याला महाराष्ट्रीय मानतात. राजशेखरची शैली रघुवंश, विक्रमाङ्कदेवचरित व नवसाहसाङ्करित. यांच्या शैलीप्रमाणे स्पष्टपणे वैदर्भी नाही. विक्रमाङ्कदेवचरित व नवसाहसाङ्कचरित ही महाकाव्ये अकराव्या शतकातील आहेत. या काव्यांत वैदर्भी रीती आहे. पण सहाव्या शतकातील दण्डीने या काव्यामुळे या रीतीला वैदर्भी म्हटले नाही खास. तेव्हा कालिदास या मूर्धन्य कवीच्या शैलीवरून या शैलीला वैदर्भी म्हणू लागले व कालिदासाचा विदर्भाशी सम्बन्ध होता असे अनुमान निघू शकते.

पण केवळ शैलीवरून काढलेल्या अनुमानाव्यतिरिक्त कालिदासाचा विदर्भाशी काही सम्बन्ध दाखविता येतो काय?

असा सम्बन्ध मेघदूतातील रामगिरीवरून दाखविता येणे शक्य आहे.

मेघदूत हे खण्डकाव्य म्हणजे एकाच कल्पनेभोवती गुम्फलेले एक लहान काव्य आहे. एका यक्षाला कुबेरीने आपल्या अलका नगरीतून हद्दपार केले व एक वर्ष रामगिरी नावाच्या एका ठिकाणी राहण्याची सजा दिली. तेथे वर्षाऋतूच्या सुरवातीला आकाशात मेघांची गर्दी झालेली पाहून त्याचे मन विरहाकुल झाले. मेघांची गर्दी हे विषण्णतेला आवाहनच असते. (मेघालोके भवति सुखिनोऽप्यन्यथावृत्ति चेत:।) विरहव्याकुलतेने चेतनाचेतनाचा भेद विसरून पक्षाने त्या मेघालाच आपला दूत बनून आपल्या पत्नीकडे संदेश नेण्याची विनंती केली व त्याला अलका नगरीकडे जाण्याचा मार्ग विस्ताराने सांगितला. या मार्गावरील रमणीय स्थळांचे पूर्वमेघात म्हणजे मेघदूताच्या पूर्व भागात-अत्यन्त सुंदर असे वर्णन आहे. दुसऱ्या उत्तरमेघ या भागात यक्षाने आपला संदेश सांगितला आहे. तो विरहार्त असलेल्या सौन्दर्यजीवी मनाचा मुक्त आविष्कार आहे. एकूण काव्यात ११५ श्लोक आहेत.

यक्ष म्हणतो, ''हे मेघा तू पुष्कर आणि आवर्त या हजारो योजने उड्डाण करणाऱ्या महान् मेघांच्या कुलातला व देवांचा राजा जो इन्द्र त्याच्या मन्त्रिमंडळाचा सदस्य आहेस. उलट मी एक अपराधी आहे. पण तरी तुझ्यावर मी आपले एक काम सोपविण्याचे धार्ष्ट्य करीत आहे. श्रेष्ठाला केलेली याचना विफल झाली तरी अधमाला केलेल्या सफल याचनेपेक्षा ती परवडते. तू संतप्तांना शरण देणारा आहेस. मी तुला माझ्या घराचा मार्ग सांगतो. हा मार्ग फार रमणीय आहे. उड्डाणाचा शीण आला की तू मार्गावरील पर्वतांवर विश्रांती घे. वर्षावाने क्षीण झालास की वाटेतल्या नद्यांचे पाणी शोषून घे. (त्या नद्या समुद्रासारख्या विशाल आहेत असे यात सूचित होते.)

रामगिरिवरून उड्डाण केल्यावर तू नुकत्याच नांगरलेल्या शेतांचा सुगंध उपभोगीत माळव्याच्या पठारावर आरूढ हो. व मग किंचित् पश्चिमेकडे जाऊन पुन: उत्तरेचा मार्ग धर. म्हणजे तुला आम्रकूट पर्वत लागेल. त्यावर पेटलेल्या वणव्यावर तू जलवर्षाव कर म्हणजे तुला आम्रकूट मोठ्या हर्षाने आपल्या शिरावर धारण करील. त्यावेळी तो साऱ्या बाजूंनी पिकलेल्या आंब्यानी पिवळा झालेला असेल. त्याच्या शिखरावर तू आरूढ झालास की भूमीच्या पिवळ्या स्तनावरील कृष्णमण्डलासारखा दिसशील. तेथे थोडा वेळ विश्रांती घेऊन व तेथील शेतांना स्नान घालून पुन: प्रवासास आरंभ कर म्हणजे तुला विन्ध्य पर्वताच्या एका कड्यावरून उडी घेतल्यामुळे त्या कड्याच्या पायथ्याशी छिन्नविच्छिन्न व विशीर्ण झालेली नर्मदा हत्तीच्या अंगावर काढलेल्या नक्षीप्रमाणे दिसेल.

विंध्य व नर्मदा पार केल्यावर सुईसारखे केसर असलेल्या पांढऱ्या केतकींच्या कान्तीने ज्यांची उपवने बहरलेली आहेत, गावांच्या सीमेवरील वेदीवर असलेले वटवृक्ष घरट्यांनी गजबजलेले आहेत,

सारी वनश्री जांभळांनी श्यामल झालेली आहे व मानस सरोवराकडे प्रवास करताना काही काळ विश्रांतीसाठी हसांचे थवे थांबलेले आहेत असा, दशार्ण देश तुला दिसेल. त्याच दिशेने वेत्रवतीजवळ विदिशा ही राजधानी आहे. जवळच असलेल्या नीचैर्गिरीवर तू विश्राम कर. तुझ्या स्पर्शाने पुलकित झाल्यामुळे तिच्यावर फुलांनी बहरलेल्या कदंबांचे रोमांच उभे राहतील.

हे मेघा, तुला उत्तरेकडे जायचे आहे आणि आपला मार्ग सोडून पश्चिमेकडे वळल्याशिवाय तुला उज्जयिनीचे दर्शन होणार नाही. पण माझ्या उत्सुकतेची पर्वा न करता मुद्दाम आपला मार्ग सोडून जिला पाहायला जावे अशीच उज्जयिनी नगरी आहे. त्या नगरीतील गगनचुम्बी प्रासादांच्या गच्चीवर विहार करताना अचानक वीज चमकल्यामुळे चकित झालेल्या युवतींचे अपाङग ज्यांनी पाहिले नाहीत त्यांचे नेत्र व्यर्थ आहेत.

हे मेघा, अविश्रान्त प्रवासामुळे थकल्यामुळे तू तेथील निर्विन्ध्या नदीच्या पाण्याने आपली तहान भागव. प्रात:काली उज्जयिनीच्या प्रासादांच्या शिखरावर सिप्रा नदीने शीतल झालेल्या वायुलहरींनी युवतींचा रात्रभर केलेल्या शृंगाराचा शीण दूर होतो. त्या स्त्रिया आपल्या केसांना शृंगारण्यासाठी जो धूप जाळतात त्यांचे लोट बाहेर येऊन तुला बिलगतील व तू वृष्टीने क्षीण झाला असलास तरी पुष्ट दिसशील.

उज्जयिनीवरून तू पुन: उड्डाण करशील तेव्हा गम्भीरा नदीच्या अन्त:करणात तुझी मूर्ती सामावलेली दिसेल. देवगिरीवर वन्य उदुम्बरांचे गुच्छ फुललेले दिसतील. पुढे तू हिमालयाच्या दिशेने जाऊ लागशील तेव्हा परशुरामाने पर्वताच्या आरपार आपला बाण मारून जे क्रौंचरन्ध्र निर्माण केले ते तुझ्या सामोरे येईल. ते पार करण्यासाठी तू स्तंभाचे रूप धारण कर. त्यामुळे बलीला पाताळात धाडणाऱ्या नीलवर्णी त्रिविक्रमाच्या पायासारखा तू दिसशील. त्यातून बाहेर पडल्यावर आकाशावर झेप घेणारी हिमालयाची शिखरे तुला दिसतील. त्याच पर्वताच्या माण्डीवर त्या पर्वताची आवडती अलका नगरी तुला दिसेल. तेथे कुबेर नगरीच्या उत्तरेस आमचे घर आहे. तेथे माझी प्रिय पत्नी दिसेल. तिला जर दैववशात् कधी न लागणारी झोप लागली असेल तर तू मोठ्याने गर्जना करून तिला उठवू नकोस. तुला राहवलेच नाही तर आपल्या स्पर्शाने सुखद झालेल्या वायुलहरी हळूहळू तिच्यावर सोड. म्हणजे सकाळी मालतीची फुले उमलतील तेव्हाच ती जागी होईल."

किंवा असा प्रसंग तुला येणारच नाही. कारण:-

नेत्रांलागी रडुनि रडुनी सूज आली असेल।<br>
उष्णश्वासे फिकटहि तिचा ओठ झाला दिसेल॥

किंचित् गालावरि विखुरले कुन्तलांचेहि जाल।
ऐसे हातावरि मुख तिने टेकलेले असेल॥
ते भासेल प्रिय जलधारा फार तैं दीनवाणे।
त्वत्संरोधे मलिन दिसत्या चन्द्रबिम्बाप्रमाणे ॥
किंवा अंकी मलिनवसनी रम्य वीणा धरोनी।
गाया लागे मजविषयाची गोड गीते रचूनी॥
होते माझी स्मृति तव तिला लोटती अश्रुधारा।
त्यांच्या योगे भिजुनी सहसा चिम्ब होतात तारा॥
मेघा तू तिला सांग.

''निराश होऊ नकोस. वाईट दिवस फार थोडे उरले आहेत. जीवनात दुःखामागून सुख येणारच. नुसतेच सुख वा नुसतेच दुःख कोणाच्याही नशिबी नसते. सुखदुःखाची गती चक्राकार आहे.

कस्यैकान्तं सुखमुगपगतं दुःखमेकान्ततो वा?
नीचैर्गच्छत्युपरि व दशा चक्रनेमिक्रमेण॥

विरहवेदना असह्य झाली की तुझ्या प्रत्येक वेदनेला प्रतिसाद देणारी वेदना माझ्यात उठत आहे हे लक्षात ठेव.

अङ्गेनाङ्गं प्रतनु तनुना गाढतप्तेन तप्तम्।
सास्रेणाश्रुद्रुतमविरतोत्कण्ठमुत्कण्ठितेन॥
उष्णोच्छ्वासं समधिकतरोच्छ्वासिना दूरवर्ती।
संकल्पैस्तैर्विशति विधिना वैरिणा रुध्दमार्गः॥

तुझ्या विरहतप्त अंगांना त्यापेक्षा शतपट विरहतत होऊन माझी अंगे कवटाळत आहेत. तुझ्या अश्रूंचा प्रवाहात माझे त्यापेक्षाही विपुल अश्रू मिसळून वाहत आहेत, तुझ्या उष्ण निश्वासात त्यापेक्षा जास्त उष्ण होऊन माझे निःश्वास मिसळत आहेत असा मला साक्षात् अनुभव येत आहे.

भित्वा सद्यः किसलयपुटान्देवदारुद्रुमाणाम्!
ये तत्क्षीरस्रुतिसुरभयो दक्षिणेन प्रवृत्ताः॥
आलिङ्ग्यन्ते गुणवति मया ते तुषाराद्रिवाताः।
पूर्वं स्पृष्टं यदि किल भवेदङ्गमेभिस्तवेति॥

देवदारूंच्या अङुंकरांचा भेद करून त्यांच्या स्त्रावाने सुगन्धित झालेले अलकेतील वारे जेव्हा दक्षिणेत माझ्यापर्यन्त पोचतात तेव्हा त्यांनी तुला आलिंगन दिले असेल या आशेने मीही त्यांना आलिंगन देतो.

असे हे अपूर्व व सुंदर कल्पनांनी नटलेले, रमणीय दृश्यांचे एक सौंदर्यजीवी जग निर्माण करणारे, संस्कृत भाषेचे सारे लालित्य पणास लावणारे भावमधुर काव्य आहे.

विदर्भाच्या दृष्टीने मेघदूतातील रामगिरी म्हणजेच नागपूरजवळील रामटेक या प्राध्यापक मिराशींच्या सिध्दांताचा विचार होणे आवश्यक आहे.

देखील उज्जयिनी ही चंद्रगुप्त विक्रमादित्याची राजधानी आहे याचा तो उल्लेख करीत नाही.

पण कालिदास अग्निमित्र शुंगाच्या काळी झाला असे मानल्याने मेघदूतातील रामगिरी हे नागपूरजवळचे रामटेक नव्हे असे ठरत नाही. यक्षाला हद्दपारीची सजा झाली होती. या हद्दपारीचे ठिकाण प्रसिध्द असावे अशी जरूर नव्हती. रामाने वनवासात असताना जेथे जेथे वसती केली अशी परंपरा आहे, ती सर्व स्थाने राजवंशाशी निगडित आहेतच असे नाही. मेघदूतात सांगितलेला मेघाचा मार्ग मेघाचा प्रवास रामटेकपासून सुरू झाला असे मानले तर जुळतो की नाही एवढाच फक्त प्रश्न आहे: तो जमविण्यास मेघदूतातील आम्रकूट म्हणजे अमरकण्टक असे मानता येणार नाही. कारण अमरकण्टक, रामटेकवरून सुरू होणाऱ्या मार्गाच्या बरेच पूर्वेकडे आहे. ज्याच्या वायव्येकडे नर्मदा आहे असे दुसरे एखादे ठिकाण आम्रकूट या नावाने प्रसिध्द असू शकते. मिराशींनी तसे ते दाखविले आहे. हे मान्य न केले तरी मेघाला पहिल्या मुक्कामानंतर लगेच नर्मदा लागते यावरून त्याचा प्रवास विदर्भातून कोठे तरी सुरू झाला असे कालिदास सूचित करू इच्छितो असे म्हणण्यास वाव आहे. मेघाच्या प्रवासाचे मूळ विदर्भात कल्पिणाऱ्या कालिदासाचा विदर्भाशी काही तरी घनिष्ट संबंध होता खास.

कालिदासाने विदर्भाविषयी रघुवंशात एक गौरवपूर्ण विधान केले आहे. विदर्भ देश हा सौराज्यरम्य म्हणजे सुराज्याने रम्य झालेला आहे असे तो म्हणतो. विदर्भाचे असे वर्णन कालिदासाशिवाय आणखी कोणी केलेले नाही. कालिदासाच्या काळी विदर्भाचे राजकीय दृष्ट्या दोन तुकडे झालेले होते व तेथे सुराज्य नांदत असले तरी ते भारतात विदर्भापासून दूर राहत असलेल्या कवींना कळण्याइतकी विदर्भाची प्रसिद्धी नव्हती. सौराज्यरम्य हे विदर्भाचे वर्णन विदर्भराजाची स्तुती करण्याच्या संदर्भात आलेले नाही. तेव्हा कालिदासाच्या मते विदर्भात खरोखरच सुराज्य नांदत होते असे मानावे लागते व तसे मानल्यास त्याचा विदर्भाशी घनिष्ट सम्बन्ध सूचित होतो.

कालिदासाचा महाराष्ट्राशी सम्बन्ध दाखविणारी काही वचने आहेत. कालिदासाच्या नाटकात महाराष्ट्री प्राकृतमध्ये श्लोक असतात. ही नाटके प्रयोगासाठी निवडलेली असल्यामुळे व कर्त्याची दिगन्त कीर्ति झाल्याशिवाय फार दूरच्या ठिकाणी त्याच्या नाटकांचे प्रयोग होणे शक्य नसल्यामुळे जेथे महाराष्ट्री प्राकृत समजले जात होते अशाच प्रदेशात कालिदासाने आपली नाटके लिहिली असे अनुमान निघते. ते त्याचा विदर्भाशी सम्बन्ध होता या कल्पनेस पोषक आहे. महाराष्ट्री प्राकृत हे उत्कृष्ट प्राकृत आहे व त्यात सेतुबन्ध या काव्यासारखे उत्कृष्ट ग्रंथ आहेत असे दण्डी म्हणतो. हे सेतुबन्ध